# मराठी भाषा समिती

## समितीची स्थापना

दिनाक १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर राज्याची राजभाषा मराठी ही शासन व्यवहाराची भाषा राहील हे धोरण शासनाने जाहीर केले आहे. सदर धोरणानुसार दिनांक २६ जानेवारी, १९६५ पासून मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली आहे. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४५ च्या तरतुदीन्वये मराठीला राजभाषेचा कायदेशीर दर्जा प्राप्त झाला. महाराष्ट्र राजभाषा अधिनियमातील तरतुदीनुसार सर्व प्रशासनिक कार्यालयीन वापराकरिता मराठीचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. या नियमात नमूद केलेली वर्जित प्रयोजने वगळता सर्व प्रशासनिक कामकाज मराठीतून करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राज्याचे राजभाषा मराठीचे धोरण ठरविण्यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातील शासकीय कार्यालयीन कामकाजामध्ये मराठीच्या वापराबाबतच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची संयुक्त समिती घटित करण्याचा प्रस्ताव बुधवार, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला असता मंत्रिमंडळाने, राज्य शासकीय कार्यालये व राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली प्राधिकरणे, महामंडळे इ. यांच्या कार्यालयीन कामकाजामध्ये शासन व्यवहारात मराठीच्या वापराबाबत तसेच केंद्र शासनाच्या त्रिभाषासूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या शासकीय/निम शासकीय कार्यालयातून मराठीच्या वापराबाबत आढावा घेऊन याबाबत राज्य शासनाला सूचना देण्यासाठी व उपाययोजना सुचविण्यासाठी राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांचा समावेश असलेली नियमित संयुक्त "मराठी भाषा समिती" घटित करण्याचा प्रस्ताव मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०११ रोजी दोन्ही सभागृहात मांडण्यात आला व सदर प्रस्ताव संमत करण्यात आला. दरम्यानच्या काळात मराठी भाषा समितीचे नियम तयार करण्याची कार्यवाही विधानमंडळाच्या नियम समितीकडून सुरु करण्यात आली. तथापि, बाराव्या विधानसभेचा कार्यकाळ संपल्याने आणि दिनांक ८ ऑक्टोबर, २०१४ रोजी तेरावी विधानसभा अस्तित्वात आल्याने तेराव्या विधानसभेत दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी मराठी भाषा विभागाच्या मा.मंत्री महोदयांनी दोन्ही सभागृहात प्रस्ताव सादर केला. मराठी भाषा समिती स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव दोन्ही सभागृहांनी एकमताने संमत केल्यानंतर मराठी भाषा समितीचे नियम व इतर अनुषंगिक बाबी पूर्ण करुन महाराष्ट्र विधानसभा नियम २४४ (थ) व २४४ (द) आणि महाराष्ट्र विधानपरिषद नियम २१४ (ड) व २१५ अन्वये दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या ज्ञापनाद्वारे प्रथमच ही समिती घटित करण्यात आली आहे.

..२/-

## समितीची रचना

**(महाराष्ट्र विधानसभा नियम - २४४ (थ) व महाराष्ट्र विधानपरिषद नियम - २१४ (ड))**

दरवर्षी विधानसभेच्या प्रथम अधिवेशनाच्या प्रारंभानंतर किंवा यथास्थिती सार्वत्रिक निवडणुकीनंतर अस्तित्वात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर "मराठी भाषा समिती"नामनिर्देशनाद्वारे घटित करण्यात येते. या समितीत एकूण १५ सदस्य असतील. त्यापैकी ११ सदस्य मा.अध्यक्ष, विधानसभेच्या सदस्यांमधून नामनिर्देशित करतात तर ४ सदस्य मा.सभापती विधानपरिषदेच्या सदस्यांमधून नामनिर्देशित करतात.

या समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील. सर्वसाधारणपणे हा कालावधी एक वर्षाचा असतो.

## मराठी भाषा समितीची कार्ये

**(महाराष्ट्र विधानसभा नियम - २४४ (द))**

(१) कार्यालयीन कामकाजांमध्ये मराठी भाषेच्या वापराबाबत आढावा घेऊन राज्य शासनाला सूचना देणे व उपाययोजना सुचविणे.

(२) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये "मराठी" ही शासन व्यवहारासाठी राजभाषा म्हणून स्वीकारण्यात आली आहे. सर्व क्षेत्रांत मराठी भाषेचा वापर करण्याच्या दृष्टीने मराठीच्या वापराचा आढावा घेण्यासाठी राज्यातील राज्य शासकीय/निम शासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेच्या वापरासंदर्भात आढावा घेऊन त्याबाबत राज्य शासनाला सूचना देणे व उपाययोजना सुचविणे.

(३) इतर बाबतीत या सभागृहाच्या समितीसंबंधीत कार्यपध्दतीच्या नियमांत अध्यक्ष जे बदल किंवा फेरफार करतील त्यांनाही ते नियम लागू होतील.